# राजे रामराव महाविद्यालय, जत.

**बी. कॉम भाग 1- मराठी (71477) (sem-1)**

*** पाठ्यपुस्तक - शब्दसंहिता-(Paper-A)**

# प्रश्नसंच

*** प्रश्न -1 योग्य पर्याय निवडा.** **गुण-10**

1) यशवंतराव चव्हाण यांनी कोणते आत्मचरित्र लिहिले आहे?

अ) आठवणीचे पक्षी ब) वारणा काठ क) कृष्णाकाठ ड) पथिक

2) यशवंतराव चव्हाण यांना पुण्याला जाण्याकरिता निर्णय घ्यायला कोणी मदत केली?

अ ) बळीबा पाटील ब ) सदानंद पाटील क ) वसंत पाटील ड ) आत्माराम पाटील

3) वालचंद गांधी नावाचे एक —---- कार्यकर्ते कराडमध्ये खादी भांडार चालवीत होते?

अ) काँग्रेस ब) मार्क्सवादी क) जहालवादी ड) हिंदुत्व वादी

4) नापास मुलांची गोष्ट हे पुस्तक —---- यांनी संपादित केले आहे?

अ) अरुण शेवते ब) अरुण नाईक क)अरुण पाटील ड) अरुण कुलकर्णी

5) कायद्याच्या शिक्षणासाठी यशवंतराव चव्हाण कोणत्या शहरात दाखल झाले?

अ) पुणे ब ) मुंबई क ) नाशिक ड ) औरंगाबाद

6) यशवंतराव चव्हाण कोणाकडून मार्क्सवाद समजावून घेण्याचा प्रयत्न करीत असत?

अ) वि. स. छापखाने ब) श्रीकांत शिंदे क) विष्णुपंत चितळे ड) ल. व. भोपटकर

7) यशवंतराव चव्हाण कोणते शिक्षण घेण्यासाठी पुण्यास गेले होते?

अ) शेतीचे ब)विज्ञानाचे क) कायद्याचे ड) अर्थकारणाचे

8) यशवंतराव चव्हाण यांचा जन्म दिनांक कोणता?

अ) 12 मार्च 1913 ब ) 12 मार्च 1915 क) 18 मार्च 1919 ड) 20 मार्च 1916

9) कुसुमाग्रज यांचे वडील कोणता व्यवसाय करीत होते?

अ) डॉक्टर ब) वकील क) इंजिनीयर ड) शिक्षक

10) कुसुमाग्रज यांना शालेय जीवनात कोणत्या खेळाची आवड होती?

अ) कबड्डी ब) व्हालिबॉल क) फुटबॉल ड) क्रिकेट

11) नाशिकच्या उत्तरेला कोणता डोंगर आहे?

अ) सप्तशृंग ब) कळसुबाई क) भामनाथ ड) दंडोबा

12) कुसुमाग्रज यांच्यावर कोणत्या नाटककाराचा खूप मोठा प्रभाव होता?

अ) गो. ब. देवल ब) काका कालेलकर क) राम गणेश गडकरी ड) नाना जोग

13) कुसुमाग्रज यांनी शालेय जीवनात लिहिलेल्या नाटकातील नायकाचे नाव काय होते?

अ) माधवराव ब) योगेश्वर क) विश्वनाथ ड) गणेश शास्त्री

14) कुसुमाग्रज यांचे प्राथमिक शिक्षण कोणाच्या गावी झाले होते?

अ) पैठण ब) नाशिक क) वणी ड) पिंपळगाव

15) कुसुमाग्रज यांना पुरोहित सरांमुळे कोणत्या गोष्टीचे मर्म नव्याने उमजले?

अ) कथा ब) कविता क) नाटक ड) कादंबरी

16) शालेय दिवसात कुसुमाग्रज उन्हाळ्याच्या सुट्टीत मुक्कामासाठी कोणत्या गावी जात असत?

अ) वणी ब) माथेरान क) वेरूळ ड) अजंठा

17) 'आपण इतरांपेक्षा विशेष कुणीतरी आहोत ' असा अहंकार कोणाच्या मनात निर्माण झाला होता?

अ) दुर्गा भागवत ब) मालती बेडेकर क) इंदिरा संत ड) शांता शेळके

18) शांता शेळके यांचा आवडीचा विषय कोणता?

अ) मराठी ब) समाजशास्त्र क) इंग्रजी ड) राज्यशास्त्र

19) शांता शेळके यांना कोणता विषय आवडत नव्हता?

अ) गणित ब) भूगोल क) अर्थशास्त्र ड) मानसशास्त्र

20) शांता शेळके यांनी कोणाच्या संस्कृत काव्याचा मराठीत अनुवाद केला आहे?

अ) त्रिवेणी ब) महावृक्ष क) मेघदूत ड) रुपसी

21) शांता शेळके यांचे शिक्षक वर्गातील इन्स्पेक्शनच्या वेळी कोणता साहित्य प्रकार शिकवीत होते?

अ) कथा ब) कविता क) नाटक ड) कादंबरी

22) अभ्यासक्रमातील शांता शेळके यांच्या पाठाचे नाव काय आहे?

अ) 50 पैकी 0 मार्क ब) निवड क) संगमनेरचे दिवस ड) रान मेवा

23) चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या वडिलांचे नाव काय होते?

अ) दादा धर्माधिकारी ब) अण्णा धर्माधिकारी क) बाबा धर्माधिकारी ड) काका धर्माधिकारी

24) चंद्रशेखर धर्माधिकारी हे कोणत्या क्षेत्रात काम करीत होते?

अ) डॉक्टर ब) इंजिनीयर क) वकील ड) ऑडिटर

25) उत्कृष्ट वक्तृत्व सादर करण्याची कला चंद्रशेखर यांनी कोणाकडून शिकली?

अ) काका ब) मामा क) वडील ड) मावसा

26) दादांनी वहीत उतरून ठेवलेल्या नोंदींना काय नाव दिले होते?

अ) डायरी ब) सटर-फटर क) नोंदवही ड) टिप्पणी

27)' शब्दांचे मोल ' हा लेख कोणत्या पुस्तकातून घेतला आहे?

अ) काळाची पाऊले ब) कृष्णाकाठ क) बलुत ड) वाटेवरच्या सावल्या

28) 'वायफळाचा मळा'हे पुस्तक कोणाचे आहे?

अ)चिं. वि. जोशी ब)पु. ल. देशपांडे क) शंकर पाटील ड) द. मा. मिरासदार

29) चंद्रशेखर यांना काय गोळा करण्याचा छंद होता?

अ) निसर्ग चित्रे ब) पोस्टाचे पाकिटे क) नेत्यांची चित्रे ड) पोस्टाची तिकिटे

30) चंद्रशेखर धर्माधिकारी यांचे उच्च शिक्षण कोणत्या गावी झाले?

अ) मुंबई ब) पुणे क) नागपूर ड) नाशिक

31) चंद्रशेखर धर्माधिकारी एल. एल. बी. ची परीक्षा कोणत्या वर्षी नापास झाले?

अ) इ.स.1953 ब) इ. स.1951 क) इ.स.1952 ड)इ. स.1954

32) चंद्रशेखर धर्माधिकारी यांचा जन्म कोणत्या गावी झाला?

अ) राजुरी ब) राजापूर क) रायबाग ड) रायपुर

33) 'संगमनेरचे दिवस' हा पाठ कोणत्या पुस्तकातून घेतला आहे?

अ) बलुतं ब) जागल्या क) विटाळ ड) चावडी

34) दया पवारांच्या विचारावर कोणाचा प्रभाव होता?

अ) महात्मा फुले ब) छ. शाहू महाराज क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ड) महात्मा गांधी

35) दया पवार यांचे लग्न परस्पर कोणी ठरविले होते?

अ) बाबांनी ब) तात्यांनी क) मामानी ड) काकांनी

36) दया पवार यांचे मूळ नाव काय आहे?

अ) कोंडीबा ब) विठोबा क) दगडू ड) धोंडीबा

37) दया पवारांनी होणाऱ्या पत्नीचे नाव मनातल्या मनात काय ठेवले?

अ) सई ब) राही क) जाई ड) जुई

38) दया पवार दहावीत कशामुळे नापास होतात?

अ) घर बांधल्यामुळे ब) आजारी पडल्यामुळे क) लग्न ठरल्यामुळे ड) परीक्षा चुकल्यामुळे

39) संगमनेरला आठवड्याचा बाजार कोणत्या दिवशी भरत असे?

अ) सोमवार ब) मंगळवार क) शुक्रवार ड) शनिवार

40) देवगडची यात्रा कोणत्या महिन्यात भरायची?

अ) भाद्रपद ब) श्रावण क) चैत्र ड) कार्तिक

41) सईचे वय किती वर्षे होते?

अ) आठ-दहा ब) दहा-बारा क) बारा -चौदा ड)चौदा -सोळा

42) शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा जन्म कोणत्या गावी झाला?

अ) रामपूर ब) पाटण क) सातारा ड) महाबळेश्वर

43) शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे मूळ नाव काय?

अ) गोपाळ ब) गणेश क) गोविंद ड) गणपती

44) डॉ. बापूजी साळुंखे यांनी कोणाला गुरुस्थानी मानले होते?

अ) महात्मा फुले ब) महात्मा गांधी क) छ. शाहू महाराज ड) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

45) डॉ. बापूजी साळुंखे यांनी कोणत्या माध्यमातून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था उभी केली?

अ) लोकाश्रय ब) राजाश्रय क) धर्माश्रय ड) धनाश्रय

46) शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे कोणत्या भाषेवर प्रभुत्व होते?

अ) हिंदी ब) इंग्रजी क) संस्कृत ड) कन्नड

47) महाराष्ट्र शासनाने शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना कोणता पुरस्कार देऊन सन्मानित केले?

अ) भारतरत्न ब) दलितमित्र क) पद्मश्री ड) पद्मभूषण

48) शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन कोणत्या विद्यापीठाने शिक्षणक्षेत्रातील डी.लिट. ही सर्वोच्च पदवी देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला?

अ) पुणे विद्यापीठ ब) औरंगाबाद विद्यापीठ क) मुंबई विद्यापीठ ड) शिवाजी विद्यापीठ

49) डॉ. बापूजी साळुंखे यांनी रयत शिक्षण संस्था केव्हा सोडली?

अ) इ.स.1954 ब) इ.स. 1955 क) इ.स. 1956 ड) इ.स. 1953

50) ज्ञानसूर्य डॉ. बापूजी साळुंखे हे कोणत्या वर्षी इहलोकातून अनंतात विलीन झाले?

अ) 8 ऑगस्ट 1995 ब) 8 ऑगस्ट 1986 क) 8 ऑगस्ट 1987 ड) 8 ऑगस्ट 1988

**** प्रश्न 2— दीर्घोत्तरी प्रश्न (2 पैकी 1)--- गुण 10**

1) यशवंतराव चव्हाण यांनी 'निवड' या लेखातून पुण्यातल्या आठवणी कशाप्रकारे शब्दबद्ध केल्या आहेत?

2) यशवंतराव चव्हाण यांचा महाविद्यालयीन जीवनातील राजकीय प्रवास' निवड' या लेखाच्या आधारे स्पष्ट करा.

3) वि. वा. शिरवाडकर यांच्यावर वाचन आणि लेखनाचे संस्कार कसे झाले ते ' वाटेवरच्या सावल्या' या लेखाच्या आधारे कथन करा.

4) वि. वा. शिरवाडकर यांच्या शालेय जीवनातील आठवणी ' वाटेवरच्या सावल्या' या लेखाच्या आधारे तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

5)'पन्नास पैकी शून्य मार्क' या लेखातून कोणता मूल्यात्मक संस्कार वाचकांना मिळतो ते तुमच्या शब्दात लिहा.

6) शांता शेळके यांनी' गणिताच्या पेपर ची आठवण येते आणि मी तात्काळ भानावर येते ' असे का म्हटले आहे, ते स्पष्ट करा.

*** प्रश्न 3— दीर्घोत्तरी प्रश्न –(2 पैकी 1)गुण 10**

1) चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी आपल्या आयुष्यातील नापास झालेला महत्त्वाचा प्रसंग 'शब्दांचे मोल 'या पाठात कसा सांगितला आहे ते सविस्तर लिहा.

2) वक्तृत्व ही कला साध्य करावयाचे असेल तर काय केले पाहिजे. हे 'शब्दांचे मोल 'या पाठाच्या आधारे सांगा.

3)' संगमनेरचे दिवस 'या लेखातून दया पवार यांना आलेले अनुभव तुमच्या शब्दात लिहा.

4) 'संगमनेरचे दिवस 'या लेखातून दया पवार यांनी होणाऱ्या पत्नीचे वर्णन कसे केले आहे ते सांगा.

5)' संकल्प सिद्धीला नेणारा महापुरुष: डॉ. बापूजी साळुंखे या लेखाच्या आधारे डॉ. बापूजी साळुंखे यांचे जीवन चित्रण लिहा.

6) शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या कार्याचा आढावा घ्या.

**** प्रश्न 4 लघुत्तरी प्रश्न –(3 पैकी 2)- गुण 10**

1) व्यक्तिमत्व ही संकल्पना स्पष्ट करा.

2) व्यक्तित्व आणि व्यक्तिमत्व यातील भेद स्पष्ट करा.

3) व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक घटकांची साधार चर्चा करा.

4) भाषेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व कसे घडते ते स्पष्ट करा.

5) 'भाषा हे व्यक्तिमत्त्व विकासाचे अधिष्ठान समजले जाते 'या विधानाचा साधार परामर्श घ्या.

6) व्यक्तिमत्व विकासातील भाषेचे महत्व विशद करा.

7) कोणत्या आवश्यक घटकातून व्यक्तिमत्व विकास साधतो ते स्पष्ट करा.

8) व्यक्तिमत्व म्हणजे काय ते लिहा.

9) भाषिक संवाद आणि देहबोली यातील साम्य व भेद स्पष्ट करा.

10) व्यक्तिमत्व विकास आणि भाषा यांचा सहसंबंध स्पष्ट करा.

***** प्रश्न 5- लघुत्तरी प्रश्न-(4 पैकी 2)- गुण 10**

1) भाषा विकासाचे मुख्य कौशल्य सांगून त्यांचा परस्पर संबंध स्पष्ट करा.

2) श्रवण प्रक्रियेतील अडथळ्यांची कारणे संक्षिप्तपणे लिहा.

3) श्रवण प्रक्रियेचे महत्व विशद करा.

4) वाचन कौशल्याचे स्वरूप व महत्त्व विशद करा.

5) वाचन कौशल्य विकासाचे उपाय सुचवा.

6) भाषण कौशल्य विकासाचे उपाय सुचवा.

7) लेखन कौशल्यांचा थोडक्यात आढावा घ्या.

8) कार्यक्रमाचे संयोजन करताना कोणकोणत्या गोष्टींची काळजी घ्यावीते स्पष्ट करा.

9) सूत्रसंचालन करताना संचालकांच्या अंगी कोणकोणते गुण आवश्यक आहेत, ते तुमच्या शब्दात लिहा.

10) आपल्या महाविद्यालयात संपन्न होणाऱ्या 'वार्षिक पारितोषिक वितरण समारंभा'च्या कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेचा नमुना तयार करा.